ऑनलाईन साप्ताहिक वाचण्यासाठी
आमचा क्युआर कोड स्कॅन करा.

साप्ताहिक
RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

# गोदावरी

परिवार
पोस्ट रजि.नं.-AR/TECH NO RNP-JAL/120/2019-21

* वर्ष २३ वे * अंक ५२ * सोमवार २६/१२/२०२२ * डाक २८/१२/२०२२ * पाने - ६ * किंमत २ रुपये

## व्हायरल इन्फेक्शनच्या रुग्णांवर प्रभावी उपचार



**जळगाव** – डिसेंबर महिना सुरु असला तरी पाहिजे तशी थंडी पडत नाही मात्र गेल्या आठवड्यापासून वातावरणात सातत्याने बदल होत असल्याने मध्येच गारठा तर मध्येच उकाडा अशी परिस्थिती निर्माण होत आहे, वातावरण बदलाचा परिणाम नागरिकांच्या प्रकृतीवर होत असून सर्दी, ताप, खोकल्याच्या रुग्णांचे प्रमाण दिवसागणिक वाढत आहे. अशा व्हायरल इन्फेक्शनच्या रुग्णांवर डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील तज्ञ फिजीशियन्सद्वारे प्रभावी उपचार केले जात आहे. वातावरणातील या बदलांना वैद्यकीय भाषेत ट्रान्झेशन ऑफ सीझन असे म्हणतात, असे म्हणतात. (पान ६ वर)

## कार्डियाक सेंटरद्वारे हजारो हृदयविकारी रुग्णांना जीवनदान

### अत्याधुनिक कॅथलॅब, प्रशिक्षीत तंत्रज्ञ व तज्ञ डॉक्टरांची टिम सज्ज

**जळगाव – भुसावळ-जळगाव महामार्गावरील गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हृदयविकारी रुग्णांसाठी स्वतंत्र कार्डियाक सेंटर सुरु असून येथील अत्याधुनिक कॅथलॅब, प्रशिक्षीत तंत्रज्ञ आणि डीएम कार्डिओलॉजिस्ट यांची २४ तास सेवा उपलब्ध असल्याने सन २०२२ मध्ये हजारो हृदयविकारी रुग्णांचे गोल्डन अवर्समधील उपचारामुळे प्राण वाचले आहे.**



हृदयविकाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना हार्ट अटॅक केव्हा येवू शकते याची वेळ निश्चित नसते, बऱ्याचदा मध्यरात्रीसुद्धा असे प्रकार घडतात, त्यामुळे हृदयविकाराचा झटका आल्यावर पहिले एक दोन तास अर्थात गोल्डन अवर्समध्ये उपचार मिळाले तर रुग्णाच्या जीवावरील धोका टळू शकतो, ही दुरदृष्टी ठेवत गोदावरी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.उल्हास पाटील यांच्या संकल्पनेतून हृदयालय अर्थात कार्डियाक हे स्वतंत्र व प्रशस्थ युनिट रुग्णांच्या सेवेसाठी खुले करण्यात आले आहे. येथे हृदयविकार तज्ञ डॉ.वैभव अनिल पाटील हे २४ तास रुग्णांच्या सेवेत असतात तसेच वेळोवेळी रुग्णांच्या जवळ जाऊन अगदी त्यांचा हात हातात घेऊन आस्थेवाईकपणे विचारपूस देखील करतात, तसेच नातेवाईकांचे समुपदेशन देखील ते करतात, यामुळे रुग्णांचा येथे उपचार घेण्याचा कल वाढला असल्याचे २०२२ मधून दिसून आले.

### हृदयविकारी रुग्णांनी रेग्युलर चेकअप करुन घेणे गरजेचे

हृदयविकाराचे वय अलीकडे कमी झाले आहे, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे आहाराकडेही निटसे लक्ष दिले जात नाही त्यामुळे आरोग्याच्या त्यातही हृदयाशी संबंधित तक्रारी कमीवयातही उद्‌भवत आहे. हृदयविकार होण्यापूर्वी शरिर काही संकेत रुग्णाला देत असते, त्याच्याकडे लक्ष द्यावे तसेच निरोगी आरोग्यासाठी आपल्या हृदयाचे रेग्युलर चेकअप करुन घेणे गरजेचे आहे, रेग्युलर चेकअप झाल्यास भविष्यातील संभाव्य धोके वेळीच ओळखून उपचार करता येतात, येथे सर्व सुविधा उपलब्ध असून त्याचा लाभ घ्यावा.

– डॉ.वैभव पाटील,
डीएम कार्डिओलॉजिस्ट

### कॅम्पच्या रुग्णांवरही नि:शुल्क व तात्काळ उपचार

गोदावरी फाऊंडेशनतर्फे खेड्यापाड्यामध्ये बऱ्याच ठिकाणी टू डी इको तपासणी कॅम्प घेण्यात आले, यात टेक्निशियन द्वारे टू डी इको तपासणी करुन त्याचा रिपोर्ट डॉक्टरांद्वारे रुग्णांना देण्यात आला. बहुतांशी रुग्णांमध्ये हृदयविकाराचे संकेत दिसून आल्याने त्यांच्यावर डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील हृदयालयात महात्मा ज्योतिबा फुले योजना तसेच प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत नि:शुल्क व तात्काळ उपचार करुन जीवनदान देण्यात आले.

## स्पाईन शिबिराचा रुग्ण घेतायं लाभ; ३१ डिसेंबरपर्यंत मुदत




जळगाव – अलीकडे रस्त्याच्या समस्येमुळे अनेक दुचाकीधारकांना तसेच वर्षानुवर्षे जड काम करणाऱ्याना स्पाईन अर्थात मणक्यांचे विकार मोठ्या प्रमाणावर उद्‌भवत आहे. उपचारासाठी हॉस्पीटलला गेले असता हजाराहून अधिक रुपयांचा खर्च विविध तपासण्या तसेच डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी लागतो. गोर-गरिब रुग्णांसह सर्वांसाठीच डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातर्फे स्पाईन शिबिराचे आयोजन करण्यात आले असून रुग्ण देखील मोठ्या संख्येने लाभ घेत आहे. येत्या ३१ डिसेंबरपर्यंत हे शिबिर सुरु राहणार आहे.

गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात अस्थिरोग विभागात अस्थिरोग तज्ञ डॉ.दिपक अग्रवाल, डॉ.प्रमोद सारकेलवाड, निवासी डॉ.सुनित बेलणकर, डॉ.राहूल जनबंधू, डॉ.पियुष पवार, डॉ.चाणक्य, डॉ.प्रसाद बांबरसे अशी मोठी टिम रुग्णांच्या सेवेत सज्ज आहे. अस्थिरोग विभागातर्फे नुकतेच स्पाईन शिबिर आयोजित केले असून याअंतर्गत मणक्यासंदर्भातील सर्वच समस्यांवर तज्ञांद्वारे मोफत उपचार केले जात आहे. रुग्णांनी सोबत येतांना आधार कार्ड व रेशन कार्ड घेऊन यावे, यामुळे **महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत** उपचार केले जात आहे.

मणक्याच्या आजाराचे निदान होण्यासाठी शिबिरांर्गत केवळ २ हजार रुपयात मणक्याचा एमआरआय केला जातो. दररोज दहा ते पंधरा रुग्ण उपचारार्थ दाखल होत असून शिबिराचा रुग्णांना लाभ दिला जात आहे.

*** संपर्क ***
**डॉ. पियुष पवार 9623043623**
**डॉ. चाणक्य 8698323289**
**डॉ. प्रसाद बांबरसे 9766688538**

## दारुमुळे पडला मानसिक आजाराचा दौरा गोदावरीतील उपचारामुळे रुग्णाची प्रकृती स्थिर



**जळगाव – २७ वर्षीय विवाहित तरुणाला दररोज दारुच्या चार क्वॉर्टर घेण्याचा नाद लागला, अशातच कुटूंबात वाद-विवाद होत असल्याने बायको माहेरी निघून गेली. अशातच मानसिक आजाराचा दौरा त्याच्यावर पडला आणि तो अति बडबड करु लागला, त्याला भास होवू लागले, अशा अवस्थेत डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील मानसोपचार केंद्रात त्याला आणले असता तज्ञांच्या यशस्वी प्रयत्नांअंती रुग्णाची प्रकृती स्थिर झाली. रुग्णासह त्याच्या आईने डॉक्टरांचे आभार मानले तसेच आता दारु पिणार नाही असा संकल्पही सदर रुग्णाने केला.**

सविस्तर माहिती अशी की, आसिफ (नाव बदलले) या २७ वर्षीय विवाहित तरुणाला तीन मुले असून हातमजुरी तो करीत असे. मिळालेल्या पैशांतून दारुच्या बाटल्या घ्यायच्या आणि त्या फस्त करायचा आणि घरी आल्यावर वादविवाद घालित असे. अशातच बायको माहेरी निघून गेली आणि तो अति दारु पिऊ लागला, उपचारार्थ इंदौर येथे जमातमध्ये त्याला नेण्यात आले मात्र तेथेही तो अति बडबड करु लागला, माणसांना तो ओळखत नसे, अशा अवस्थेत त्याचा भाऊ जळगावी घेऊन आला आणि गोदावरी फाऊंडेशनच्या डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

येथील आपातकालीन कक्षात निवासी डॉ. हुमेद महाडिक यांच्यासह टिमने रुग्णाला इंजेक्शन देवून त्याला स्थिर करत वॉर्डात शिफ्ट केले. मानसोपचार तज्ञ डॉ.विलास चव्हाण, डॉ.गोविंद यादव यांच्यासह अन्य डॉक्टरांनी रुग्णाची हिस्ट्री घेवून काही तपासण्या केल्या तसेच नेत्ररोग तज्ञांद्वारे तपासणी करुन घेण्यात आली. उपचार सुरु झाल्यापासून तीनच दिवसात रुग्णाची प्रकृती ठणठणीत झाली, ही वार्ता रुग्णाच्या पत्नीला समजली असता, ती पुन्हा सासरी येणार असल्याचे रुग्णाने आनंदाने डॉक्टरांना सांगितले.

## सर्व प्रकारच्या ई.एन.टी. इन्फेक्शनवर रुग्णालयात होतात उपचार

**जळगाव** – हिवाळ्याच्या दिवसात इएनटी अर्थात कान नाक घशाचे आजार मोठ्या प्रमाणावर बळावतात. इएनटी तज्ञांद्वारे डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात अशा सर्वच रुग्णांवर उपचार केले जातात.

मानवी शरीरातील अवयव एकमेकांना जोडलेले असल्याने जेव्हा एक अवयव दुखत असतो तेव्हा त्याचा परिणाम दुसऱ्या अवयवावर होतोच. कान, नाक आणि घसा हे अवयव एकमेकांना पूरक आहेत. म्हणून जेव्हा घसा दुखतो तेव्हाच कान दुखी सुरू होते आणि नाक सर्दीने दुखून वाहू लागते. काहींना वर्षानुवर्षे असे त्रास होता तर काहींना केवळ थंडीच्या दिवसात असे त्रास मोठ्या प्रमाणावर उद्‌भवतात. अशा सर्वच आजारांसाठी रुग्णालयात इएनटी तज्ञांची टिम आहे यात इएनटी सर्जन डॉ.विक्रांत वझे, डॉ. अनुश्री अग्रवाल, डॉ.पंकजा बेंडाळे यांच्यासह निवासी डॉ.हर्षल महाजन, डॉ.श्रुती खंडागळे, डॉ. रितू रावल, डॉ.चारुशिला सोनवणे यांचा समावेश आहे.

### ही आहेत लक्षणे



#### कान दुखी

कानाची निगा न ठेवल्याने, कान स्वच्छ न ठेवल्याने कान दुखी वाढते. ह्यात कानातून पाणी येणे, कमी ऐकू येणे आणि ह्यासारखी अनेक दुखणी उद्भवतात. कानातून पाणी येणे ह्या प्रकारात कानात जंतू संसर्ग होतो. कान लाल होतो आणि खाज येते. ईएनटी इन्फेक्शन जो कानात जंतू संसर्ग झाल्याने होतो. त्यामुळे कान दुखतो आणि क्वचित ताप येतो.



#### घसा दुखी

घसा दुखण्याच्या सामान्य लक्षणांमध्ये घसा दुखणे, टॉन्सिल्स वाढणे, आवाज बसणे, घशात खवखव अशी लक्षणे दिसून येतात. मात्र अनेकदा कान किंवा नाकात इन्फेक्शन होऊन दुखू लागतं तेव्हा घसा पण दुखू लागतो. दात दुखतात. तोंडात लहान फोड येतात.

अधिक माहितीसाठी
**निवासी डॉक्टर रितू रावल** यांच्याशी
८६०५९०५४३७ यांच्याशी संपर्क साधावा



#### नाकाची समस्या

दुषित पाणी, हवाबदल ह्यामुळे सर्दी होते आणि नाकात शेंबूड जमा होतो, नाक वाहते. तात्पुरत्या उपायांनी सर्दी बरी होत मात्र प्रतिकारशक्ती कमी असलेल्या रुग्णांमध्ये सर्दीमुळे अन्य समस्यांही सुरु होतात. अनेकदा सर्दी सायनस च रूप घेते. ह्यामध्ये सर्दी सोबत डोकेदुखी, कोरडा खोकला, दात दुखी आणि घसा दुखतो. पोटात गडबड आणि जीव घाबरतो.

# सन २०२२ मध्ये एक हजाराहून अधिक मोफत महाआरोग्य शिबिरांद्वारे रुग्णांची सेवा संकल्प पूर्ण

## हजारो रुग्णांना महात्मा ज्योतिबा फुले योजनांचा दिला लाभ

**जळगाव – जळगावसह बुलढाणा जिल्ह्यात १ जानेवारी २०२२ पासून ते आतापावेतो एक हजाराहून अधिक मोफत महाआरोग्य शिबिरांचे यशस्वी आयोजन गोदावरी फाऊंडेशनतर्फे करण्यात आले. दर दिवशी तीन शिबिरं जिल्ह्यातील काना-कोपर्यातील नागरिकांसाठी घेतली जात होती, शिबिरातून रेफर झालेल्या हजारो रुग्णांना डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले योजनेचा लाभ देण्यात आला.**

गोदावरी फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ.उल्हास पाटील यांच्या संकल्पनेतून जानेवारी ते डिसेंबर २०२२ पर्यंत अविरतपणे महाआरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. जळगाव जिल्हा, बुलढाणा जिल्हा इतकेच नव्हे तर बर्‍हाणपूर जिल्ह्यातही नागरिकांसाठी आरोग्य सेवा पोहोचविण्यात यश आले आहे. रुग्णसेवा हिच ईश्वरसेवा असे ब्रीद घेऊन रुग्णसेवा देत असलेल्या गोदावरी फाऊंडेशनला स्थानिक कार्यकर्त्यांचे अनमोल सहकार्य लाभल्याने मोफत आरोग्य सेवा देण्याचा उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण होऊ शकला.

अनेक ठिकाणी शिबिरात टू डी इको तपासणी मोफत करण्यात आली असून हृदयविकारी रुग्णांचा त्याचा मोठा लाभ झाला आहे. हृदयविकाराची संकेत जाणवलेल्या रुग्णांवर डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील हृदयालयात डीएम कार्डिओलॉजिस्ट डॉ.वैभव पाटील यांनी एन्जीओग्राफी, एन्जीओप्लास्टी करत रुग्णांना जीवनदान दिले आहे.

गोदावरी फाऊंडेशनच्या सदस्या डॉ. केतकीताई पाटील यांनी देखील स्वत: अनेक शिबिरांच्याठिकाणी जाऊन उत्कृष्ठ रुग्णसेवा दिली जात आहे किंवा नाही याची खातरजमा करुन घेतली, खुद्द डॉ.उल्हास पाटील यांची कन्या डॉ.केतकी ताई ही शिबिरस्थळी येत असल्याचे पाहून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले, अनेक ज्येष्ठांनी भरभरुन आशिर्वाद दिले. एकाच शिबिरात सर्वच आजारांचे निदान देण्यासाठी १८ ते २० तज्ञांची टिम खेडोपाड्यात उन्हातान्हात पाणीपावसातही जाऊन रुग्णसेवा बजावत आहे.

यात कान-नाक-घसा, नेत्ररोग, अस्थिरोग, त्वचाविकार, मानसिक आजार, स्त्रीरोग तज्ञांद्वारे तपासण्यांची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती यामुळे एकाच छताखाली विविध आजारांचे निदान होत असल्याने ग्रामस्थांकडून देखील शिबिरांबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे, हे शिबिराचे यश आहे. शिबिरांसाठी पॉम्प्लेट बॅनरसाठी मिडीया विभागातील आर्टिस्ट, प्रिंटींगसह रुग्णालयातील मार्केटिंग टिमचे अनमोल सहकार्य लाभले.

### हजारो रुग्णांवर शस्त्रक्रिया

***शिबिरातून रेफर झालेल्या हजारो रुग्णांवर आवश्यकतेनुसार प्लीहा, विविध प्रकारच्या गाठी, थायरॉईड, पाईल्स, भगंदर, फिशर, डायबेटिक फूट, हर्निया, अल्सर, आतड्यांमधील अडथळे, अपेंडीक्स, आतड्यांचे पीळ, क्षयरोग, हायड्रोसिल, मुतखडा, मुत्रपिंडातील खडे, प्रोस्टेट, पित्ताशय खडा इत्यादी शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुले योजना तसेच प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत करण्यात आल्यात.***

### गाव ते रुग्णालयापर्यंत वाहनव्यवस्था, भोजनव्यवस्था मोफत

*अनेक गोर-गरजू रुग्णांना दोन वेळचे जेवण करणेही मुश्किल होते, त्यामुळे त्यांचे निरोगी आरोग्याची जबाबदारी घेत गोदावरी फाऊंडेशनतर्फे गावापासून ते रुग्णालयापर्यंत येण्यासाठी वाहनव्यवस्था उपलब्ध करुन दिली जात होती, तसेच मोफत भोजनाचे पार्सल्स देखील दिले जात असल्याने रुग्णांचा हॉस्पीटलचा प्रवास सुखकर करण्याचा प्रयत्न सफल होतांना दिसून आला. रुग्णांसह नातेवाईकांच्या चेहर्‍यावर रुग्णालयातून परततांना आनंद, समाधान दिसून येत होते.*

# अध्यात्मीय कार्यात आरोग्य शिबिराचा भाविकांना घेता येणार लाभ

यावल – तालुक्यातील हिंगोणा येथे श्रीमद् भागवत सप्ताहानिमित्त जय श्री दादाजी मित्र मंडळ व गोदावरी फाऊंडेशनच्या सहकार्याने सोमवार, दि.२६ डिसेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत हटकर कॉलनी, हिंगोणा येथे भव्य महाआरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. भागवत ऐकण्यासाठी येणार्‍या भाविकांना आरोग्य शिबिराचा लाभ घेता येणार आहे.

हृदयविकाराचे निदान करणारी टू डी इको तपासणी शिबिरात मोफत केली जाणार असून ईसीजी कार्डिओग्राफ, रक्तदाब तपासणीही केली जाणार आहे. याशिवाय



कान नाक घसा, नेत्रविकार, स्त्रीयांचे आजार, अस्थिरोग, हृदयविकार, दारुमुळे उद्भवणारे मानसिक आजार, त्वचाविकार अशा सर्व प्रकारच्या आजारांवर उपचार केले जाणार आहे. अधिक माहितीसाठी तेजस पाटील यांच्याशी ९८६०६ ९१२१५ संपर्क साधावा.

# फुकणीत भरले महाआरोग्य तपासणी शिबिर

जळगाव – तालुक्यातील फुकणी येथे ग्रामपंचायत आणि गोदावरी फाऊंडेशनच्या सहकार्याने बुधवार, दि.२१ डिसेंबर रोजी महाआरोग्य तपासणी शिबिर भरविण्यात आले होते, या शिबिरात स्वयंस्फूर्तीने ग्रामस्थांनी उपस्थीत देत आरोग्याची तपासणी करुन घेतली.

फुकणीच्या ग्रामपंचायत कार्यालयात सकाळी १० वाजता शिबिरास प्रारंभ झाला. यावेळी सरपंच यमुनाताई सपकाळे, उपसरपंच डॉ. कमलाकर पाटील, ग्रामपंचायत सदस्य सरलाताई सपकाळे यांच्या उपस्थीतीत शिबिरास सुरुवात झाली. यावेळी काही रुग्णांची ईसीजी तपासणी आणि रक्तदाब तपासणीही मोफत करुन देण्यात आली. यावेळी इएनटी निवासी डॉ.रितू रावल, डोळ्यांचे डॉ.अंजली मयेकर, स्त्रीरोग डॉ.निलीजा बिर्‍हाडे, हाडांचे डॉ.चाणक्य, हृदयरोग विभागातील निवासी डॉ.विशाल चव्हाण यांनी रुग्णांची तपासणी केली. यावेळी २८ रुग्णांना शस्त्रक्रियेंची गरज असल्याने त्यांना डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात येण्याचा सल्ला दिला. येतांना आधार कार्ड व रेशन



कार्ड आणण्याचे आवाहनही करण्यात आले. रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत रुग्णांवर शस्त्रक्रिया व उपचार करण्यात येणार आहे.

# लोणवाडी खुर्दतील आरोग्य शिबिर ग्रामस्थांसाठी वरदान

जळगाव – तालुक्यातील लोणवाडी खुर्द येथील ग्रामस्थांसाठी बुधवार, २१ डिसेंबर रोजी गोदावरी फाऊंडेशनच्या सहकार्याने महाआरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ईसीजी कार्डिओग्राफ, रक्तदाब तपासणी तसेच विविध आजारांच्या तज्ञांद्वारे रुग्णांची तपासणी ही झाली त्यामुळे हे शिबिर ग्रामस्थांसाठी वरदान ठरले.

रामदेव बाबा मंदिर येथे बुधवारी दुपारी आरोग्य शिबिरास सुरुवात झाली. यावेळी सरपंच नकुलबाई भिल, उपसरपंच सुगराबाई धाडी, सदस्य रमेश धाडी, धारा राठोड, शागूर धाडी, रमेश भिल, चंद्रकांत देवरे, जुलाल पाटील, भूषण पाटील, शिवाजी चव्हाण यांनी शिबिरास भेट देवून ग्रामस्थांनी देखील शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले. गावातील नागरिकांनी देखील शिबिर स्थळी येवून तज्ञ डॉक्टरांद्वारे तपासणी करुन घेतली.

तपासणीदरम्यान काही रुग्णांना विविध चाचण्या जसे की, सोनोग्राफी, एक्स रे, रक्ताच्या तपासण्यांची आवश्यकता असल्याने



डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात येण्याचा सल्ला दिला आहे. महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत रुग्णांवर रुग्णालयात उपचार केले जाणार आहे. शिबिरासाठी चरणदास प्रल्हाद चव्हाण यांच्यासह रुग्णालयातील मार्केटिंग टिमचे सहकार्य लाभले.

# दहिवद आरोग्य शिबिरात मोफत उपचारामुळे ग्रामस्थांनी व्यक्त केले समाधान



दहिवद – स्व.अनुसया कपुरचंद बहारे यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ गोदावरी फाऊंडेशनच्या सहकार्याने गुरुवार, २२ डिसेंबर रोजी महाआरोग्य तपासणी शिबिर दहिवद येथील महिला बचतगट हॉल, जिल्हा परिषद शाळेजवळ घेण्यात आले. शिबिरात तज्ञ डॉक्टरांकडून मिळालेल्या मोफत उपचार व मार्गदर्शनामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

शिबिराचे उद्घाटन दहिवदचे उपसरपंच प्रविण काशिनाथ माळी यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी अमळनेर पं.स.चे सभापती सुभाष शिवाजी पाटील, विद्यमान सरपंच देवानंद कपुरचंद बहारे, चेअरमन जयवंत गुलाबराव पाटील, सुनिल पाटील मा. उपसरपंच, हिराबाई भिल, ग्राप सदस्य, गटनेते शिवाजी सुकलाल पारधी, धुळे येथील रामेश्वर कपुरचंद बहारे, जितेंद्र बहारे यांची उपस्थीती होती. हृदयविकाराची प्राथमिक लक्षणे दिसून येणार्‍या रुग्णांची शिबिरात हृदयाची सोनोग्राफी अर्थात टू डी इको तपासणी मोफत करण्यात आली. यात काही रुग्णांचा रिपोर्ट हा हृदयविकाराचे संकेत देत होता त्यामुळे एन्जीओग्राफीसाठी रुग्णांना डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात येण्याचा सल्ला दिला आहे. यात रुग्णांना ब्लॉकेजेस आढळल्यास महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत एन्जीओप्लास्टी केली जाईल याबाबतही तज्ञांद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच इएनटी विभागातील निवासी डॉ.चारुशिला सोनवणे, नेत्ररोग डॉ. आशुतोष, ओबीजीवायचे डॉ.आफिया खान, हाड-मणक्यांचे डॉ.प्रसाद बांभरसे, हृदयविकार विभागातील निवासी डॉ.मोमीन मोहम्मद अब्दुल्ला अमीन, टेक्निशियन जयेश जोश यांनी रुग्णांची तपासणी केली. शिबिरात डॉक्टरांनी रुग्णांच्या शंकाचे संपूर्ण निरसन केल्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# मोहिदेपूर: आरोग्य शिबिरात हजारो रुपयांची टूडी इको तपासणी मोफत

बुलढाणा – जिल्ह्यातील जळगाव जामोद जवळील मोहिदपूर येथे शनिवार, २४ डिसेंबर रोजी महाआरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. गोदावरी फाऊंडेशनच्या सहकार्याने शिबिरात हजारो रुपयांची टू डी इको तपासणी अगदी मोफत करण्यात आली, यामुळे काही रुग्णांच्या लक्षणांवरुन हृदयविकाराचे निदान झाल्याचे निर्दशनास आले.

वंचित बहुजन आघाडी पिंपळगाव काळे सर्कल व गोदावरीच्या सहकार्याने आयोजित शिबिरात टू डी इको तपासणीसह ईसीजी कार्डिओग्राफ, मधुमेह, रक्तदाब तपासणी करण्यात आली. तसेच कान-नाक-घसा विकार, डोळ्यांचे आजार, स्त्रीयांचे आजार, हृदयविकार, दारुमुळे उद्भवणारे विकार अशा



सर्वच प्रकारच्या आजारांवर तज्ञांद्वारे उपचार करण्यात आले. शिबिरातून रेफर झालेल्या रुग्णांवर डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत उपचार केले जाणार आहे.

या शिबिरासाठी सारथी फाऊंडेशनचे संस्थापक युवानेते प्रकाश विठ्ठलराव भिसे, पत्रकार श्रीकृष्ण सनिसेबाबर, ज्ञानेश्वर कोकाटे, प्रविण धोरण, ब्रह्मदेव घाटे, गोपाळ घाटे आदिंचे सहकार्य लाभले.

संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी अक्षरमुद्रा प्रिंटर्स, प्लॉट नं.६, कलेक्टर बंगल्याच्या बाजूला, साने गुरूजी कॉलनी, जळगांव येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com(अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# गोदावरी व्यवस्थापन महाविद्यालयात रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरीचा पदग्रहण सोहळा




**जळगाव –** गोदावरी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च एमबीए महाविद्यालयात रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरीचा पदग्रहण सोहळा झाला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे स्वागत करून झाले. व्यवस्थापन महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रशांत वारके, गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय पाटील यांनी मार्गदर्शन केले.

रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरीच्या गतवर्षीची सेक्रेटरी खुषभू कांतरिया हिने तिचे अनुभव सांगितले व नवीन मेंबरचे अभिनंदन केले. यावेळी नवीन प्रेसिडेंट चेतन शिंदे याने वर्षभरामध्ये रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरीतर्फे घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची माहिती दिली. सूत्रसंचालन समन्वयक प्रा.प्राजक्ता पाटील यांनी तर आभार सेक्रेटरी वर्षा झोपे यांनी मानले. यावेळी गोदावरी फाउंडेशन संचलित सर्व महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांनी रोट्रॅक्ट क्लब ऑफ गोदावरीच्या मेम्बरशीपसाठी उपस्थित होते.

## डॉ.उल्हास पाटील स्कूल भुसावलच्या विद्यार्थ्यांनी पटकाविले जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेमध्ये तिसरे स्थान



**जळगाव –** येथे जिल्हा क्रीडा संकुल स्पर्धा २०२२फ अंतर्गत आंतर जळगाव जिल्हा बास्केटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये भुसावळ येथील डॉ.उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी तिसरे स्थान प्राप्त केले.

या सर्व विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षक विनय काळे, पराग पाटील तसेच आरिफ सर यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन गोदावरी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.उल्हास पाटील, मुख्याध्यापिका अनघा पाटील यांनी केले.

## भुसावळ स्कूलचा ज्ञानेश करणार नाशिक येथे नेतृत्व



**भुसावळ –** जिल्हा स्तरावरील मैदानी स्पर्धेत डॉ उल्हास पाटील इंग्लिश मिडीयम स्कूल भुसावळ मधील ज्ञानेश कुंदन नाफडे या खेळाडू ने ४०० मीटर धावणे या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला आहे.

नाशिक विभाग स्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदवत ज्ञानेश जळगाव जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहे . स्पर्धा नाशिक येथे होणार आहेत .तसेच २०० मीटर धावणे या स्पर्धेत संकेत नाईक याने तृतीय क्रमांक मिळवला आहे.

## डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयातील शरिररचना शास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांना दिली शपथ

**जळगाव –** गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या शरीररचना शास्त्रविभागात आज प्रथम वर्ष विद्यार्थ्यांना मृत शरीराची हेळसांड न करण्याची शपथ देण्यात आली.

मृत शरीराला सन्मान मिळावा तसेच अभ्यासासाठी मिळालेले ह्या शरीराचा अभ्यासासाठी उपयोग करू तसेच या शरीराला योग्य सन्मान देण्याची शपथ देण्यात आली. यावेळी शरीररचना शास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.अमृत महाजन, प्रा.डॉ शुभांगी घुले, प्रा.डॉ.अनिता फटींग, प्रा.डॉ.अनिल पुंगळे, प्रा.डॉ.जमीर हे उपस्थीत होते.

मान्यवरांनी शरीररचना शास्त्र विषयाचा अभ्यास करतांना करावयाचे नियोजन व याची व्याप्ती तसेच वेळेचे नियोजन या बाबत मार्गदर्शन केले. तसेच देहदानातून प्राप्त शरीराची हेळसांड न होवू देता त्या शरीराला सन्मान मिळवून देण्यासाठी शपथ देण्यात आली.



## तालुकास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत भुसावळ येथील डॉ.उल्हास पाटील स्कूलचे यश



**भुसावळ –** शहरातील बियाणी मिल्ट्री स्कूल येथे तालुकास्तरीय आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक स्पर्धा २०२२ चे आयोजन करण्यात आले होते. यात भुसावळ येथील डॉ.उल्हास पाटील इंग्लिश मिडीयम शाळेतील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

चौदा वर्षाखालील मुलांमध्ये २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रथम विजेता संकेतवार, १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत, मुलांमध्ये द्वितीय विजेता ज्ञानेश्वर नाफाडे, ४०० मीटर धावण्याच्या शर्यती द्वितीय विजेता ज्ञानेश नाफाडे, रिले ४०० मीटर द्वितीय विजेता. २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सतरा वर्षाखालील मुलांमध्ये तृतीय विजेता राम गाडगे, ८०० मीटर किंवा १०० मीटर धावण्याची शर्यतीत दुसर्या विजेता समर्थ पाटील आणि शॉर्ट पुट थ्रो किंवा हॅमर थ्रो अंडर १७ बॉईज प्रथम विजेता तुषार घाटे यांनी यश संपादन केले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक गोदावरी संस्थेचे अध्यक्ष डॉ.उल्हास पाटील, मुख्याध्यापिका अनघा पाटील यांनी केलेले आहेत.

या विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षक विनय काळे,पराग पाटील, आरिफ सर यांचे मार्गदर्शन लाभले.

## एचडीएफसी बँक पाचोरा शाखेत ६८ दात्यांचे रक्तदान

**पाचोरा –** HDFC बँक शाखा पाचोरा व गोदावरी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने HDFC बँक पाचोरा येथे रक्तदान शिबीर झाले. यात ६८ दात्यांनी रक्तदान केले.

यावेळी रक्तदान शिबिराचे आयोजक रोशन जैन, ज्ञानेश्वर ताडे, कार्यक्रमाची सुरुवात प्रथमता यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली.



डॉ. प्रीती मगर प्रीती मगर, संजय कुमावत, भरत शेंनडे, सुखदेव पाटील व वरीष्ठ पदअधिकारी उपस्थित होते व एचडीएफसी कर्मचाऱ्यांनी रक्तदान शिबिर उत्कृष्टपणे पार पाडले, यशस्वीतेसाठी गोदावरी फाऊंडेशन डॉ.उल्हास पाटील रक्तपेढीचे डॉ. सोमेश शेळके, रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील, राज तंवर, यश पाटील, मयुर चौधरी यांनी परिश्रम घेतले.

## डॉ.उल्हास पाटील स्कूल, सावदाचे क्रीडा स्पर्धेत यश

**सावदा –** आंतरशालेय तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी जळगाव येथील रायसोनी स्कूल जळगाव येथे १७ वर्षाखालील विद्यार्थ्यांच्या फुटबॉल स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. त्यात सावदा येथील डॉ.उल्हास पाटील इंग्लिश मिडीयम शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून रायसोनी इ.एम स्कूल जळगाव यांना पराभूत केले आहे .

तसेच ८ डिसेंबर रोजी आयोजित स्पर्धेत १४ वर्षाखालील विद्यार्थी जळगाव येथील रुस्तमजी स्कूल जळगाव या विद्यार्थ्यांच्या विरुद्ध बास्केटबॉल स्पर्धा जिंकली आहे.

तसेच याच विद्यार्थ्यांनी अमळनेर येथे सेंड मेरी स्कूल अमळनेर येथे देखील



आपली विजयाची पताका फडकवली आहे. शाळेचे क्रीडाशिक्षक असलम अली, वशिम शहा आणि सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

## रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरीतर्फे विदगाव विद्यालयात पुस्तके, वह्यांचे वाटप

जळगाव – अभिमान महादू वारके विदगाव विद्यालयातील विद्यार्थ्यांना रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरीतर्फे श्यामची आई हे पुस्तक व वह्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमात रोटरॅक्ट क्लब ऑफ गोदावरीचे समन्वयक प्रा.प्राजक्ता पाटील, रोटरॅक्ट क्लब प्रेसिडेंट चेतन शिंदे, सेक्रेटरी वर्षा झोपे व क्लबचे मेंबर्स उपस्थित होते. शाळेमधील सर्व विद्यार्थ्यांना श्यामची आई या पुस्तकाचे व सोबत एक वहीचे वाटप केले गेले.

या मागचा उद्देश म्हणजे मुलांना शिस्त व नैतिकता समजावी व या पुस्तकामधील कथांमधून चांगला बोध मिळावा असा होता.

यावेळी शाळेचे सचिव विकास वारके, मुख्याध्यापक न्याहाळदे, समन्वयक रवींद्र अमृत पाटील, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## संपादकीय...

# प्लास्टिक बंदीचा फास

भारतात प्लास्टिकबंदीचा विषय किती अवघड, बहुपदरी आणि यंत्रणांना हाताळण्यास अवघड आहे, हे महाराष्ट्र सरकारच्या ताज्या निर्णयावरून लक्षात येते. १६ सप्टेंबर २०१४ पासून महाराष्ट्र सरकारने एक-दोनदा नव्हे पाच वेळा प्लास्टिक बंदीची अधिसूचना काढली. यातली शेवटची अधिसूचना एक जुलै, २०२२ रोजी निघाली. तेव्हाही राज्य सरकारने ङआता मात्र प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी कठोरपणे आणि राज्यात सर्वत्र होईलच, असा निर्धार व्यक्त केला. जुलै ते नोव्हेंबर या पाच महिन्यांत हा निर्धार कितपत अमलात आला, हे दिसते आहेच. परवा एक डिसेंबरला हा निर्णय पुन्हा फिरविण्यात आला. मात्र, मूळ पर्यावरणप्रेमी धोरणापासून सरकार दूर गेलेले नाही, हे दाखवून देण्यासाठी वापरात येणारे प्लास्टिक विघटनशील कसे असावे आणि त्याच्या वापराची अनुमती कशी केंद्रीय संस्थेकडून घेणे आवश्यक आहे, असे सरकारी परिपत्रक निघाले. सरकारने पर्यावरण रक्षणाच्या बाजूने हा निर्णय मुळीच घेतलेला नाही. त्याचे कसनुसे समर्थन सरकार करते आहे. मात्र, प्लास्टिक बंदीचा विषय हा सागराच्या तळाशी, नद्यांच्या मुखांशी, विक्राळ कचरा डेपोंमध्ये आणि गायीगुरांच्या पोटात जितकी गुंतागुंत निर्माण करतो. तितकाच गुंतागुंतीचा आहे. त्यात जसे अर्थकारण गुंतले आहे. त्याचप्रमाणे समाजाची सवय हाही यातला महत्त्वाचा मुद्दा आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सफ तसेच लघू उद्योजकांच्या संघटनांच्या आग्रहाला



विनंती देऊन राज्य सरकारने ६० जीएसएमपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक वस्तूंच्या वापराला परवानगी दिली आहे. जीएसएम म्हणजे ङ्ग्रॅम पर स्क्वेअर मीटरफ याचा अर्थ एक चौरस मीटर प्लास्टिकच्या तावाचे वजन साठ ग्रॅमपेक्षा कमी असेल तर बंदी आणि जास्त असेल तर परवानगी, असे ते सूत्र होते. ते पुन्हा गेले आहे. जितके जीएसएम जास्त तितके ते प्लास्टिक महाग होते आणि त्याच्या निर्मितीची प्रक्रियाही बदलते. तसेच, त्याची वाहतूक, त्याचे पॅकिंग आणि त्याच्या चमचा, ग्लाससारख्या वस्तू हेही सारे महाग होत जाते. या साऱ्यांचा अखेरचा बोजा ग्राहकावर पडतो आणि त्याने पाठ फिरवली तर प्लास्टिकशी निगडीत असे सारे अर्थचक्रच बिघडून जाते. महाराष्ट्र हा दिल्लीच्या खालोखाल प्लास्टिकचा वापर करणारा प्रांत आहे. प्लास्टिकशी निगडीत असे राज्यात हजारो रोजगार आहेत. या साऱ्याला गेल्या पाच महिन्यात बसलेला फटका छोट्या-मोठ्या उद्योगांना जाणवतच होता. त्यातूनच, त्यांची चिंता वाढत होती. ती आता सरकारने ऐकली आहे. आता वापरात येणारे प्लास्टिक हे विघटनशील असावे आणि त्याच्या उत्पादनासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच ङसेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ प्लास्टिक इंजिनीअरींग अँड टेक्नॉलॉजीफ यांच्याकडून रीतसर अनुमती घेतलेली असावी, असेही महाराष्ट्र सरकारने म्हटले आहे. ही नव्या निर्णयाची तांत्रिक बाजू झाली.

प्रत्यक्षात काय होईल आणि कुठले नियम किती पाळले जातील, हा प्रश्न आहेच. कमी प्रतीचे व जाडीचे प्लास्टिक चालवून घेणाऱ्या सरकारी यंत्रणा आणि बंदीची भीती घालून दमदाटीने पैसे उकळणाऱ्या यंत्रणा या दोन्हींचा साऱ्या उद्योगांना आणि ग्राहकांना त्रासच होता. तो आता कमी होईल. मात्र, मूळ समस्या त्याने सुटणार नाही.

# गोदावरी फाऊंडेशनतर्फे महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



**जळगाव** – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मंगळवार, ६ डिसेंबर रोजी गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे अभिवादन करण्यात आले.

गोदावरी फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ.उल्हास पाटील यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन माल्यार्पण केले. यावेळी डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.एन.एस.आर्वीकर, रजिस्ट्रार प्रमोद भिरुड, आयुर्वेदिक महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. हर्षल बोरोले, अकाऊटंट किशोर झांबरे, आयटी विभागाचे किशोर साळी, शशिकांत तायडे, नर्सिग ऑफिसच्या मनिषा खरात, मिडीया विभागातील गायत्री कुलकर्णी यांच्यासह गोदावरी नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थीनींची उपस्थीती होती. यावेळी मान्यवरांनी बाबासाहेबांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देवून अभिवादन केले.

## गोदावरी अभियांत्रिकीत महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**जळगाव** – गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय जळगाव, येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिनी. तसेच काही निवडक विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. सदर कार्यक्रमास समस्त प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, कर्मचारीवृंद, व सर्व विभागाचे विभाग प्रमुख, उपस्थित होते.





## डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयात महामानवास अभिवादन



**जळगाव** – महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयात विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ. एस. एम. पाटील (परिसर संचालक), डॉ.ए.पी. चौधरी (संशोधन संचालक), कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शैलेश तायडे कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुनमचंद सपकाळे व तसेच कृषी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रवीण देवरे , डॉ. एम. आर. भावसार प्रा. एम.ए. देशमुख,प्रा. एन. डी. पाटील,प्रा. व्ही.एस.पाटील, डॉ.सागर चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजनांचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापिका पी.आर.दहिवले व तीनही महाविद्यालयाचे प्राध्यापक प्राध्यापीका व इतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका पी.आर.दहिवले यांनी तर आभार प्रदर्शन प्राध्यापक गोणशेटवाड बी.एम. यांनी केले.

## प्राचीन खान्देश-१


## खानदेशातील अश्मयुगीन स्थळे

# महाराष्ट्र आणि खानदेश

### प्रकरण ३ : विकास आणि नैसर्गिक स्थान

### अजिंठा लेणी

१८७४ त त्यानें सर्व लेण्यांची उत्तमप्रकारें पहाणी करून बरींच चित्रें साफ केलीं. हैदराबाद मध्ये अजिंठा पव्हेलियन मध्ये निजामाने मोठे संग्रहालय बनवले आहे. हर्षचरित एक सांस्कृतिक अध्ययन वासुदेव शरण अग्रवाल यांत वेशभूषा व इतर चर्चा आहे. कोट आणि पॅन्ट हा पेहराव कुषाणांची देणगी आहे. अतिशय टोकाच्या वातावरणात तग धरण्यासाठी ते तंग कपडे वापरत असत. संस्थान सलवार सुतन स्वतन असा अपभ्रंश होत गेला. तबल्याचे तीन प्रकार दिसतात. उर्ध, आलिंग, काखेत वाजवायचा होय. पगडीचे प्रकार कुलह पगडी चापाकार ही शक वापरत. पचतळ्यांची माळ नाण्यांची माळ सोन्याची तर गरीब मातीची. इंद्रछत्र एकशे आठ मोत्यांचे पदर असलेली संपूर्ण छाती व अंग भरून जाते. कुंकू पाचव्या शतकात आले असावे. शारंगधर शिंगाची शस्त्रे धनुष्यबाण होय.





येथे पहिल्या शतकांनंतर ही पहीली फेज तर ते तिसऱ्या शतकापर्यंत दुसरी फेज दिसते. चार चैत्यगृह ही पाचव्या शतकातील दुसऱ्या फेज मध्ये दिसते. चैत्यगृहात सातवाहनांच्या काळातील चित्राची पहिली पायरी दिसते षडदंत जातकावर आधारित आहेत. गुहा क्रमांक १, २, १६, १७ मध्ये शिल्लक आहेत. पहिल्या हिनयान फेजची मात्र खराब झाली आहेत

अजिंठा लेणी नंबर नऊ मध्ये दगडी मुखदर्शन लाकडी लवकर खराब होत असल्याने म्हणून नंतरच्या काळात दगडी आलेले दिसते. तसेच नाशिकला ही दिसते. तेथील चैत्यगृहाचेही दगडी मुखदर्शन दातेरी बीमवर मानवी चेहरे कोरलेले दिसतात. दाराशी एक यक्ष आहे. महामायुरीच्या यादीप्रमाणे नाशिकच्या यक्षाचे नाव मसुंदरफ आहे. त्याच्यावर लेख आहे. मी हा यक्ष दान दिला त्रिस्केलियन कोरलेले आहेत. ग्रीक रोमन मिथकांमधील तसेच जुन्नरला ही कोरलेले दिसते. आत चैत्यगृह, स्तूप, बाजूला खांब तेथील विहार आधीचे आहेत. त्यावरील लेखांतून हे समजते. खांब हे बुडाला घटात बसवल्या सारखे दिसतात. अजिंठा लेणीच्या चित्रमितीचा सूत्रधार म्हणून वडालदेव यांचे नाव येते. स्तूपाचे दोन प्रकार आहेत हिनयान यात फक्त स्तूप असतो. महायान यात बुद्ध मुर्ती असते. गंधकुटी बुद्ध अत्तरप्रिय असल्याने गंधवायिक मुख्य धर्मपाल सोळा नंबरच्या लेणीत सूत्रधाराबद्दल उल्लेख आहेत. जो सध्याच्या शब्दात वर्णन करायचे तर कांन्ट्रक्टर किंवा सहकार्य करणाऱ्या पैकी असावा.

**चित्र आणि शिल्पात दिसणारे घटक** – महायान पंथातील तारक देवता आहेत त्यात चंडमहारूषण ही कुंपणाजवळ असते अगदी रूद्रासारखी आहे. यात दिसणारे यक्ष, गंधर्व, किंन्नर, नाग ही आधीची नागपूजा आणि यक्षपुजेतील घटक आहेत. नदी आणि पाण्याजवळ निवास करणारे जे पुर्वी समृध्दी आणि भरभराट व्हावी म्हणून पुजल्या जाणाऱ्या निसर्ग देवता होत्या. वृक्षी, नदी, हरीती – पांचाल किंवा जाबाल या होय.



सौ. सरला भिरुड
संशोधक व लेखिका

(क्रमशः)

# कोविड-१९ नंतर भारतातील प्रवासी पुनरुत्थान दरम्यान पर्यटनातील ट्रेंड



कोरोना व्हायरसच्या प्रसाराचा आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत प्रवासांवर व्यापक परिणाम झाला. गेली दोन वर्षे प्रवासी उद्योगाने पाहिलेली सर्वात कठीण वर्षे होती. कोविड-१९ नंतर भारतातील प्रवासी पुनरुत्थान दरम्यान पर्यटनात काय ट्रेंड होत आहे ते येथे आहे

या महामारीच्या काळात पर्यटन आणि आदरातिथ्य उद्योगाला सर्वाधिक फटका बसला. कोरोनाव्हायरसच्या प्रसाराचा आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत प्रवासांवर व्यापक परिणाम झाला कारण मागील दोन वर्षांच्या लॉकडाऊन ही प्रवासी उद्योगाने पाहिलेली सर्वात कठीण वर्षे होती.

HT Lifestyle ला दिलेल्या मुलाखतीत, अंकिता शेठ, StayVista चे सह-संस्थापक, शेअर केले, अनेक प्रवासी निर्बंधांमुळे, गंतव्य विवाह, पार्टी, कॉर्पोरेट इव्हेंट्स आणि अगदी वीकेंड ट्रॅव्हल्समध्ये पूर्ण विराम दिल्यामुळे अर्थव्यवस्था पर्यटन क्षेत्रासाठी चिंतेची बाब बनली आहे. . आता, साथीच्या रोगानंतर प्रवासावरील निर्बंध कमी करण्यात आले आहेत. तथापि, लोकांचा सुट्ट्या आणि प्रवासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन आमूलाग्र बदलला आहे.

तिने खुलासा केला, अतिथी मोठ्या, मोकळ्या जागांना प्राधान्य देतात जिथे ते सक्रिय राहू शकतात आणि त्यांच्या सह-प्रवाश्यांच्या आसपास फक्त एकाच खोलीत मर्यादित न राहता. एकत्र विशेष क्षण साजरे करणे आता पूर्वीपेक्षा अधिक मूल्यवान आहे. कोविड-१९ मुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमध्ये गेल्या काही महिन्यांपासून उद्योगाला हळूहळू माहिती मिळत आहे आणि आपण असे म्हणू शकतो की पर्यटन अखेरीस पुनर्प्राप्त होण्याच्या मार्गावर आहे.

लॉर्ड्स हॉटेल्स अँड रिसॉर्ट्सचे उपाध्यक्ष विकास सुरी यांच्या मते, गेल्या दोन वर्षांत कोविड-प्रेरित लॉकडाऊनमुळे सर्वाधिक प्रभावित झालेल्या हॉस्पिटॅलिटी सेक्टरमध्ये मार्च २०२२ पासून चांगली सुधारणा झाली आहे. ते म्हणाले, सर्वत्र मागणी प्रामुख्याने विवाहसोहळे आणि सभा, प्रोत्साहन, परिषदा आणि प्रदर्शने (MICE) आणि व्यावसायिक प्रवास यामुळे क्षेत्र वाढले. लग्नसोहळे, घरगुती विश्रांती, लाँग वीकेंड, सण आणि व्यावसायिक प्रवास येत्या काही महिन्यांत वाढतच जातील. भारतातील वेडिंग डेस्टिनेशन्सचा मोसम खूप व्यस्त असतो आणि बहुतेक दिवसात हॉटेल्स जवळजवळ विकली जातात.

ते पुढे म्हणाले, अंतर्देशीय प्रवास अद्याप प्री-कोविड पातळीपर्यंत पोहोचला नाही परंतु देशांतर्गत प्रवास, रिव्हेंज टूरिझम, मुक्काम, डेकेशन आणि लहान सुट्टीच्या विश्रांतीमुळे परिणाम जाणवत नाही. त्याबद्दल बोलताना, कामत ग्रुप ऑफ हॉटेल्सचे संचालक विशाल कामत यांनी आश्वासन दिले की, आता महामारी संपली आहे, हे क्षेत्र हळूहळू पण निश्चितपणे त्याच्या पायावर उभे आहे. प्रवासावरील निर्बंध कमी करण्याबरोबरच, उच्च व्याप्ती दरांसह गुंतवणूकदारांचे लक्ष वेधून घेणाऱ्या हॉस्पिटॅलिटी क्षेत्राला, भारतातून आणि भारतातून येणाऱ्या फ्लाइटवरील मर्यादा शिथिल केल्याचा फायदा झाला आहे. आर्थिक घडामोडी उदार झाल्यामुळे आणि कोरोनाव्हायरसचा प्रसार रोखण्यासाठी घालण्यात आलेल्या मर्यादा शिथिल झाल्यामुळे, कंपन्यांना त्यांच्या समभागांच्या मूल्यात वाढ होताना दिसत आहे. शेवटी, उद्योग साथीच्या आजारातून सावरत आहे आणि आर्थिक क्रियाकलापांच्या पुनर्प्राप्ती दरम्यान आदरातिथ्य क्षेत्र एक प्रमुख विजेता आहे.

रोहित अग्रवाल,
सहा.प्राध्यापक,
हरीभाऊ जावळे इन्स्टीट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट केटरिंग टेक्नॉलॉजी

साप्ताहिक
गोदावरी परिवार

## देवस्थान :- मिनाक्षी सुंदरेश्वर मंदिर





मीनाक्षी मंदिराच्या उत्तरेला सुंदरेश्वर मंदिराचा गोपूर आहे. सुंदरेश्वर मंदिराच्या चारीही बाजूला गोपूर आहेत. त्यावर हिंदू देवदेवतांच्या, पशूपक्ष्यांच्या मूर्ती आहेत. प्रत्येक गोपूर नऊ मजली आहे. त्याचे प्रवेशद्वारे वीस मीटर उंच आहेत. कुंबथडी मंडपममध्ये शंकरासह अनेक देवदेवतांच्या तसेच ऋषिमुनींच्या प्रतिमा आहेत. जवळजवळ एका कक्षात मीनाक्षी व सुंदरेश्वरजी यांची वाहने आहेत. येथेच चांदीत मढवलेला हंस व नंदी आहेत. तेथून थोड्या अंतरावर मदुराईचा राजा विश्वनाथ नायक याचा मंत्री आर्य नायक मुठलीच्या काळात बनविलेला सहस्त्रस्तंभ मंडप आहे. यात एकूण १८५ स्तंभ आहेत. यावरही देवदेवता, नृत्यांगना, योद्धे यांच्या प्रतिमा आहेत.

या मंदिराला चार दारे आहेत. प्रवेशद्वारावर गणपतीची मोठी प्रतिमा आहे. या मंदिराबाबत एक दंतकथा आहे. मलायाराजा पंड्या निपुत्रिक होता. म्हणून राजा व राणीने एक यज्ञ केला. यावेळी अग्नीतून तीन वर्षीय बालिका प्रकट झाली. ती होमातून बाहेर पडून थेट राणी कंचनमालाकडे गेली. मोठी झाल्यानंतर या राजुकमारी मीनाक्षीने मोठा पराक्रम गाजवला.

आजूबाजूच्या सर्व राजांना पराभूत करून तिने स्वत:चा एकछत्री अंमल प्रस्थापित केला. त्यानंतर कैलास पर्वतावर जाऊन शंकराची आराधना केली व त्याला पती म्हणून मिळविण्यात ती यशस्वी ठरली. मीनाक्षी मंदिराच्या जवळच सुवर्ण पुष्करणी नावाचे सरोवर आहे. त्याच्या बाजूला सुंदर हिरवाई आहे. फेब्रुवारी महिन्यात मीनाक्षी व सुंदरेश्वर यांच्या मूर्तींला येथे आणून या सरोवरता स्नान घातले जाते.

**कसे पोहचावे - मदुराई रेल्वे जंक्शन हे मीनाक्षी अम्मन मंदिराच्या अगदी जवळ आहे. या मीनाक्षी अम्मान मंदिरापासून या मदुराई रेल्वे जंक्शनपर्यंतचे अंतर फक्त १.३ किमी आहे. म्हणजेच ट्रेनने मदुराई रेल्वे जंक्शनवर पोहोचल्यानंतर तिथून पायी प्रवास करून या मीनाक्षी अम्मान मंदिरात जाता येते.**

## सुविचार

सर्वात मोठे वरदान म्हणजे, खरा मित्र लाभणे.

## संत तुकाराम सार्थ गाथा
### अभंग क्र. ४९




**एकादशीव्रत सोमवार न करिती ।**
**कोण त्यांची गति होईल नेणों ।।१।।**
**काय करूं बहु वाटे तळमळ ।**
**आंधळीं सकळ बहिर्मुख ।।ध्रु.।।**
**हरीहरां नाहीं बोटभरी वाती ।**
**कोण त्यांची गति होईल नेणों ।।२।।**
**तुका म्हणे नाहीं नारायणीं प्रीति ।**
**कोण त्यांची गति होईल नेणों ।।३।।**

**अर्थ –** जे कोणी एकादशी आणि सोमवार हे व्रत करत नाही त्यांची गत काय होईल काय माहित? काय करावे सर्व लोकांचे कल्याण व्हावे यासाठी खूप तळमळ वाटते परंतु हे सर्वच संसारिक लोक आंधळे व बहिर्मुख आहेत. हरी व हर म्हणजे हरी आणि शंकर या दोन देवतांना जे लोक बोटभर वातीने देखील ओवाळत नाही त्यांची गती काय होईल हे काही कळत नाही. तुकाराम महाराज म्हणतात ज्या कोणाला नारायणा विषयी आवडच नाही त्यांची गती काय होईल ते काही मला कळतच नाही.

## सप्ताहातील दिनविशेष

✻ २९ डिसें. जागतिक जैवविविधता दिन
✻ ०३ जाने. २०२३ बालिका दिन (सावित्रीबाई फुले जयंती)






## पाककृती — व्हेज लॉलिपॉप्स

**साहित्य –** एक वाटी बारीक चिरलेली कोबी, एक वाटी बारीक चिरलेली फ्लॉवर, १/२ वाटी बारीक चिरलेले किंवा किसलेले गाजर, १/४ वाटीबारीक चिरलेल्या ग्रीन बीन्स, ३/४ वाटीबारीक चिरलेला कांदा, १/२ वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, १/२ वाटी बारीक चिरलेली ढोबळी मिरची, १/४ वाटी बारीक चिरलेले किंवा किसलेले बीट, १/२ वाटी फ्रेश / फ्रोज़न वाटणा, एक वाटी मैदा, एक टी स्पून कॉर्नफ़्लॉवर, १२ ते १५ लहान ब्रेडस्टीकस, एक टेबल स्पून आले -लसूण - मिरची पेस्ट, चवीनुसार मीठ, तळण्यासाठी तेल.




**कृती –** सगळ्या कापलेल्या भाज्या, कांदा, कोथिंबीर आणि चवीपुरते मीठ टाकून एकत्र करा. हे एकत्र केलेले मिश्रण १५ - २० मिनिटे तसेच ठेवा. तोपर्यंत मैदा एका तव्यावर कोरडा भाजून घ्या आणि गार करायला ठेवा. १५-२० मिनिटे झाल्यावर मिश्रणात जास्त झालेले पाणी पिळून काढा. हे पाणी फेकून देऊ नका. हे पाणी तुम्ही भाजी किंवा सूप करण्यासाठी वापरु शकता. तसेच जर भाज्यांचे मिश्रण जर जास्त कोरडे झाले तर हे पाणी वापरु शकता. नंतर ह्या मिश्रणात आले - लसूण - मिरची पेस्ट, भाजलेला मैदा आणि कॉर्नफ़्लॉवर घाला. हे मिश्रण चांगले मिक्स करा. ह्या मिश्राणाचे दंडगोलाकार गोळे करा. एका गोळयामधे एक ब्रेड स्टिक घुसवा आणि गोळा चांगला दाबा. असे सगळे गोळे तयार करून घ्या. एका कढई मधे तेल चांगले गरम करा आणि हे सगळे गोळे तांबुस रंगावर तळुन घ्या. हे गरमागरम लॉलीपॉप कोणत्याही चटणी किंवा सॉस बरोबर खावा.

## किचन टिप्स

- स्वयंपाक करायला सुरूवात करण्यापूर्वी एका भांड्यात पाणी गरम करून ठेवा. पुलाव, खिचडी, भाज्यांची ग्रेव्ही तयार करताना गरम पाणी वापरलं तर ते शिजण्यासाठी वेळ कमी लागतो.
- दररोज तुरीची डाळ (वरण) कुटुंबातील सदस्यांना फिकट वाटत असेल.तर त्याची चव वाढवण्यासाठी सर्वप्रथम डाळ शिजवा. नंतर कढईत जिरे, कांदा, टोमॅटो, हिरवी मिरची आणि थोडा गरम मसाला टाकून परतून घ्या. नंतर या फोडणी मध्ये मध्ये शिजवलेली तूर डाळ घाला.
- न्यूडल्स मोकळ्या होण्यासाठी शिजताना त्यामध्ये एक थेंब तेल टाका आणि शिजल्यावर गरम पाण्यातून निथळून थंड पाण्याखाली धरा.
- जर जेवणात मीठ जास्त असेल तर असू होऊ नये त्या साठी लक्षात ठेवा मीठ अन्न पूर्ण शिजल्यावर शेवटी घालायचे आहे. भाजी शिजल्यावर किंवा वरण शिजल्यावर शेवटी मीठ टाकल्यास अन्नात मीठ जास्त होत नाही आणि चवही वाढते.
- खीर शिजल्यावर त्यात साखर टाकली जाते. मात्र साखरेऐवजी गूळाचा वापर करा. यामुळे खीरीची चवही वाढेल आणि ती आरोग्यासाठीही फायदेशीर ठरेल. त्यामुळे जर गोड खायला आवडत असेल तर गुळाची खीर बनवा आणि सर्व्ह करा. हे आरोग्यासाठी फायदेशीर ठरेल.
- भजे आहे मात्र बेसनाचं संपले असेल तर घरीच असलेली हरभऱ्याची डाळ ग्राइंडरमध्ये बारीक करून पीठ लवकर तयार करता येते. आणि वेळ असल्यास हरभरा डाळ अर्धा तास भिजत घालावी. नंतर त्यांना बारीक करून गरमागरम भजे बनवा.



## थंडीत त्वचेची अशी घ्या काळजी



दुधात २ बदाम भिजवून त्याची सालं काढून वाटून घ्यावे आणि थोडंसं संत्राचा रस घालून हात-पाय व चेहऱ्यावर लावावे. १/२ तासानंतर धुऊन टाकावे. मिश्रित त्वचेसाठी क्लींजिंग आणि नरिशिंगने कोरडे कोरडेपणा दूर होतो. जर घरीच फेशियल करू शकत असाल तर मुलतानी माती, मध आणि द्ह्याचे वापर करू शकता. लिंबाच्या रसात अरेंडीचे तेल सम मात्रेत घेऊन चेहऱ्यावर मालीश करून कोमट पाण्याने चेहरा धुऊन टाकावा. रात्री झोपताना लिंबाचा रस, गुलाब पाणी व ग्लिसरीन लावून झोपायला पाहिजे. हात-पाय मऊ व चकचकीत होतात. कोरडी त्वचेसाठी हळद, बेसन, लिंबाचा रस आणि मधाचा पॅक बनवून लावल्याने कोरडेपणा कमी होतो. पपईचा गर १/२ तासासाठी चेहरा व हातावर लावून धुऊन टाकायला पाहिजे. त्याने त्वचा चमकदार बनते. टोमॅटो, गाजर व काकडीचा रस हे तिघही सम प्रमाणात घेऊन त्यात २ लिंबाचा रस टाकून त्याची पेस्ट करून रोज १/२ तास लावून ठेवावे नंतर थंड पाण्याने धुऊन घ्यावे. मधात लिंबाचा रस मिसळून लावल्याने सुरकुत्या कमी होण्यास मदत होते. (साभार)



स्किन संबंधित समस्यांसाठी
आजच संपर्क साधा
डॉ.दिनेश कुलाळ
८४५९३९४८१३



### याचे केले पाहिजे सेवन

✻ ताजे फळ व सलाडाचे सेवन नियमितपणे केले पाहिजे. चणे, मठ, मूग सारखे कडधान्याचे सेवन केले पाहिजे. रात्री झोपताना २ ग्लास दूध प्यायला पाहिजे.
✻ दिवसभरात किमान ८-१० ग्लास पाणी प्यायला हवे. सुक्या मेव्याचे सेवन केले पाहिजे.

## गौतम बुद्ध



### बोधप्रद गोष्ट

बुद्ध हे मनोविजयी होते हे सर्वज्ञात आहे. ते नेहमी शांत, सस्मित, आणि प्रसन्न असत. त्यांच्या सहवासात येणारया लोकांनाही या प्रसन्नतेचा लाभ होत असे. पण काही लोक असेही होते की त्यांना गौतमांना मिळणारा सन्मान सहन होत नसे. त्यांचा अगदी जळफळाट होत असे. असाच एक माणूस एकदा गौतमांना रागवावयास भाग पाडायचेच, त्यांचा अपमान करायचाच, फजिती करायचीच असे ठरवून त्यांच्या प्रवचनाच्या ठिकाणी आला.

प्रचंड जनसमुदाय जमला होता. तथागत शांतपणे त्या समुदायाला मार्गदर्शन करत होते. तेंव्हा हा माणूस तेथे पोचला आणि सर्वांसमोर त्याने गौतमांना न भूतो न भविष्यति अश्या शिव्या दिल्या. जमलेले लोक अस्वस्थ झाले, संतापलेही. पण तथागत शान्त होते. त्यांच्या चेहरयावरील स्मित जरासुद्धा ढळले नव्हते. तो माणूस बराच वेळ अद्वातद्वा शिव्याशाप देत होता. बरयाच वेळाने तो थकून थांबला व डोळे तारवटून गौतमांकडे पहात राहिला.तथागतांनी स्मितहास्य केले व शान्त स्वरात ते बोलले, **मी तुला एक प्रश्न विचारू काय?** विचारा तो गुरगुरला.

**जर तुला कोणी एखादी वस्तू भेट दिली आणि ती भेट स्वीकारण्यास तू नकार दिलास तर त्या भेटीवर मालकी कुणाची?** मालकी?

**हां, ती भेटवस्तू कोणाकडे राहील?** इतकही कळत नाही? सोपं आहे, ती वस्तू त्या देणारयाकडे राहील तो माणूस म्हणाला.

**अगदी बरोबर! तथागत स्मित करीत म्हणाले, मग जर मी तुझे हे शिव्याशाप स्वीकारण्यास नकार दिला तर ते कोणाकडे रहातील?**

तो माणूस सुन्न झाला आणि तथागतांच्या चरणी लागला.

**तात्पर्य :** जगात कोण आपल्याला काय बोलेल यावर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही. पण त्यांच्या स्तुतिशापांचा स्वीकार करणे न करणे हे पुर्णपणे आपल्याच हाती असते. आपण स्वताचा अपमान करून घ्यायचा म्हटला तर तो घोर अपमान होऊ शकतो अन्यथा ते असतात केवळ शब्दांचे बुडबुडे!

साप्ताहिक गोदावरी परिवार


# पोटदुखीचे एंडोस्कोपीद्वारे निदान

## ६ महिन्यात ३५० हून अधिक रुग्णांवर उपचार

**जळगाव –** पोटदुखीच्या समस्येचे निवारण करण्यासाठी अलीकडे एंडोस्कोपी ही देखी महत्वपूर्ण ठरत आहे. एंडोस्कोपीद्वारे निदानच नव्हे तर उपचार देखील केले जातात. मागील सहा महिन्यांपूर्वी डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात एंडोस्कोपीची सुविधा खुली करुन देण्यात आली असून दर गुरुवारी गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ.भुषण चोपडेंद्वारे आलेल्या रुग्णांवर उपचार केले जातात, आतापावेतो साडेतीनशेहून अधिक रुग्णांवर उपचार करण्यात आले आहे.

रुणाच्या सारखं पोटात दुखत असेल किंवा उलटीतून वा शौचेतून रक्त पडत असेल तर त्यानुसार तोंडातून वा शौचेच्या जागेतून ही दुर्बिण आत घातली जाते. यात रुग्णाच्या पचननलिकेच्या आत डोकावण, आतल्या भागांचे फोटो घेणे, व्हिडीओच्या माध्यमातून आतील दृश्य टिपले जातात. तसेच काही तपासण्यासाठी बायोप्सी (म्हणजे तुकडा) काढून घेता येतो. तपासाबरोबरच विविध उपाययोजना करणे जसे की शस्त्रक्रिया न करता दुर्बिणीद्वारेच समस्येचे निराकरणही केले जाते. या दुर्बिणीची नळी इतकी लवचिक असते की पचन मार्गातल्या विविध पोकळ्यातून ही कशीही वळते आणि विविध अवयवांचं निरीक्षण तसेच त्यानुसार उपाययोजना या दुर्बिणीद्वारे करता येतात. रुग्णालयात सवलतीच्या दरात एन्डोस्कोपीची सुविधा उपलब्ध असून दर गुरुवारी गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ.भुषण चोपडे यांच्याद्वारे तपासणी केली जाते. त्यांना मेडिसीन व सर्जरी विभागातील डॉक्टर, नर्सेस सहाय्य करतात.

**गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ.भुषण चोपडेंद्वारे उपचाराचीही सुविधा उपलब्ध**




### एन्डोस्कोपीचे प्रकार

#### दुर्बिणीद्वारे चिकित्सेतून रुग्णांना दिलासा



रुणाच्या अन्ननलिकेत अडकलेला माशाचा काटा, नाणं किंवा अनावश्यक मांसाचा गोळा दुर्बिण चिकित्सकेद्वारे काढला जातो. शरीराच्या आत वाढलेला वा अन्ननलिका, जठर, मोठे आतडे यात कुठेही खूप रक्तस्त्राव होत असेल तर तो थांबवता येतो. अत्यंत कमी वेळात व जास्त त्रास न होता होणारी ही निदान व उपचार पद्धतीन रुग्णांना दिलास देते.

**– डॉ. स्मृती भोजने, निवासी डॉक्टर**
९६०४०३०७६१

#### कोलोनोस्कोपी



कोलोनोस्कोपी म्हणजे गुदद्वारातून नळी आत घालून संपूर्ण मोठ्या आतड्याची तपासणी आपल्या डोळ्यांनी करता येते. यामुळे या आतड्याला असलेला त्रास, आजार याचं निदान करता येतं. तुम्हालाही याबाबत काही समस्या असल्यास आजच संपर्क साधून नावनोंदणी करुन घ्यावी.

**– डॉ. मैत्रेयी बिरादर, निवासी डॉक्टर**
८४०८८३१२०२

#### जठराची एन्डोस्कोपी



जठराची एन्डोस्कोपी ही नळी तोंडातून घालून अन्ननलिका, जठर अगदी लहान आतड्यांपर्यंत जाऊन डोळ्यांनी ते ते अवयव तपासता येतात. ज्या रुग्णांना अपचन, ॲसिडीटी, गॅसेस किंवा रक्ताच्या उलट्या इत्यादी लक्षणं असल्यास एन्डोस्कोपीचा उपयोग होतो.

**– डॉ.विशाल चव्हाण, निवासी डॉक्टर**
९४०४०३०७८७

## व्हायरल इन्फेक्शनच्या रुग्णांवर...

**(पान १ वरुन)** लहानग्यांपासून वयोवृद्धापर्यंत सर्वांनाच वातावरण बदलाच्या परिणामांना सामोरे जावे लागते. वातारवणात बदल होत असताना अनेक विषाणूजन्य आजरांत (व्हायरल डिसीजीस) वाढ होते. परिणामी ताप, सर्दी, खोकल्याने रुग्ण त्रस्त होतात. यामुळे लहानग्यांची शाळेला तर चाकरमान्यांची कार्यालयाला सुट्टी पडते. औषधी घेतल्यावर ताप, सर्दी तर बरे होतात मात्र शरिराला देखील विश्रांती मिळावी यासाठी आरामही घ्यावा असे डॉक्टर सांगतात.

सद्यस्थीतीला बदलणाऱ्या हवामानामुळे प्रकृती खालावत असलेले रुग्ण उपचारार्थ डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात येत असून फिजीशियन डॉ.पाराजी बाचेवार, डॉ.सी.डी.सारंग हे उपचार करीत आहे. याबाबत डॉ.बाचेवार यांनी सांगितले की, सद्यस्थीतीला सर्दी, कफ, खोकला अशा लक्षणांची रुग्ण मोठ्या प्रमाणावर येत आहे, त्यामुळे रुग्णाची प्रकृती पाहून काही मेडिसीन तसेच गरम पाण्यात मीठ टाकून गुळण्या करण्याचा सल्ला आम्ही देत आहोत. तसेच डॉ.सारंग म्हणाले की, औषधी-गोळ्यांबरोबरच गार्गर आणि वाफ घेण्यानेही व्हायरल इन्फेक्शन लवकर कमी होत असल्याचा रुग्णांना देतो. ४ ते ५ दिवसांच्या औषधोपचाराने रुग्णाला येणारा ताप कमी होत नसल्यास सीबीसीसह अन्य रक्ताच्या तपासण्या करण्याचा सल्ला तज्ञांद्वारे दिला जात आहे. त्याद्वारे आजाराचे निदान करुन पुढील उपचारही रुग्णालयातून दिला जात आहे. रुग्णांनी आजारपण अंगावर न काढता लगेचच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन रुग्णालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## चित्रफितीच्या माध्यमातून मुख कर्करोगावर मार्गदर्शन

**जळगाव –** येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालयाच्या नाक कान घसा विभागाच्या डॉ. श्रुती खंडागळे यांनी चित्रफितीच्या माध्यमातून मुखकर्करोगावर मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थाध्यक्ष माजी खा.डॉ उल्हास पाटील, अधिष्टाता डॉ. एन एस आर्विकर, डॉ नेहा वझे, नाक कान घसा विभागाच्या प्रमुख डॉ. अनुश्री अग्रवाल, डॉ विक्रांत वझे, डॉ. पंकजा बेंडाळे, पॅथालॉजी विभागाच्या डॉ. वैशाली नागोसे यांच्यासह २५ डॉक्टर उपस्थीत होते.

यावेळी डॉ. श्रुती यांनी मुख कर्करोगाचे तोंडाचा, जबडयाचा, जिभेचा, लाळग्रंथी, नाकाचा, गालाचा या विविध प्रकारावर चर्चा करतांना यांची लक्षणे व उपचाराविषयी माहिती दिली. यानंतर उपस्थीतांच्या विविध शंकाचे निरसन करण्यात आले.

**चर्चासत्र ज्ञानवाढीसाठी उपयुक्त**

चर्चासत्राच्या माध्यमातून आजारांविषयी तज्ञांना असलेले ज्ञान व प्रश्नोत्तराच्या माध्यमातून त्यांच्यातील उणिवा किंवा अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती



देवाणघेवाण होत असल्याने ज्ञानवाढीसाठी उपयुक्त असल्याचे डॉ. उल्हास पाटील यांनी सांगितले.

**चर्चासत्रातून अत्याधुनिक उपचार पध्दती होते अवगत**

अशा प्रकारच्या विविध आजारांवर महाविद्यालयाने चर्चासत्र सूरू केले असून पदव्युत्तर अभ्यासक्रमातील डॉक्टरांना विविध अत्याधुनिक उपचार पध्दती व त्यांच्यातील कमतरता समजून त्यांच्या ज्ञानात वृध्दी होत असल्याचे अधिष्टाता डॉ. एन एस आर्विकर यांनी सांगितले.

## मोतिबिंदू, तिरळेपणावरील उपचारामुळे मिळाली दृष्टी

**जळगाव –** ही सुंदर सृष्टी पाहण्यासाठी चांगल्या दृष्टीची आवश्यकता असते मात्र काहींना वयोमानापरत्वे मोतिबिंदू जडतो किंवा काहींना तिरळेपणाची समस्या बालपणापासून किंवा काही अपघाताने उद्भवते, अशा रुग्णांना गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाने तारले. त्यामुळे वर्षभरात हजारो रुग्णांना सृष्टी पाहण्यासाठी नवी दृष्टी प्राप्त झाली आहे.

डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात डोळयांच्या कुठल्याही आजारावर तज्ञ डॉक्टरांद्वारे यशस्वी उपचार केले जातात. रुग्णांनी सोबत येतांना आधार कार्ड व रेशन कार्ड जरुर आणावे. रुग्णालयात लागू असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत उपचार केले जातात. रुग्णालयात नेत्ररोग तज्ञ डॉ.प्रिती पाटील, डॉ.मयूरी निलावड, डॉ.नि.तू.पाटील, रेटिना तज्ञ डॉ.अश्विनी पाटील, निवासी डॉ.आकाश, डॉ.कल्पना, डॉ.अनुजा, डॉ.शिफा मिर्झा, डॉ.आशुतोष गिरबिडे, डॉ.अंजली मयेकर हे कार्यरत आहे. सोमवार ते शनिवार दररोज १० ते ४ या वेळेत रुग्णांसाठी ओपीडी सुरु असते तसेच सकाळी सहा वाजेपासूनच शस्त्रक्रियांना देखील सुरुवात होते, तात्काळ उपचारामुळे लगेचच रुग्णाला एक दोन दिवसात डिस्चार्ज दिला जातो.

जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ मध्ये दररोज ६० ते ७० रुग्णांची तपासणी तर १५ ते २० रुग्णांच्या डोळ्यांवर विविध शस्त्रक्रिया करण्यात आल्यात. रुग्णालयातर्फे घेण्यात आलेल्या आरोग्य शिबिरांमधून देखील एक लाखाहून अधिक रुग्णांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली असून गरजेनुसार रुग्णालयात योजनेंतर्गत शस्त्रक्रिया करण्यात आल्यात.



**नेत्रपटलदोषाची कारणे -**

**✻ जन्मत: बाळाचे वजन कमी असणे (दीड किलोपेक्षा कमी)**

**✻ जन्मत:च इतर आजार असणे (फुप्फुसाचे आजार, इ.)**

**✻ बाळांची नेत्रतपासणी कधी करावी?**

**✻ जन्माच्या दोन ते तीन आठवडयानंतर व तेव्हापासून पुढे रक्तवाहिन्यांची संपूर्ण वाढ होईपर्यंत नेत्रतज्ज्ञांकडून नेत्रपटलाची संपूर्ण तपासणी करावी.**

**✻– उपचार –✻**

रक्तवाहिन्यांमधील दोषाचे प्रमाण जास्त असेल तर सदोष रक्तवाहिन्यांची वाढ होऊ नये यासाठी लेसर उपचार करावा लागतो. लेसर उपचाराने पडदा निसटण्याची शक्यता कमी होते.


## आर्टिस्ट पाहिजे...

✻ पोस्ट तयार करणे
✻ व्हिडीओ एडिट करणे
✻फेसबुकवरील पोस्ट व्हायरल करणे
✻संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक
✻कलात्मक पोस्ट बनविता येणे आवश्यक
✻ स्वत:चा लॅपटॉप असल्यास प्राधान्य



– मुलाखत –
✻ दि. २८ डिसेंबर २०२२
✻ वार : बुधवार

: स्थळ :
डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल
जळगाव-भुसावळ रोड, जळगाव खुर्द


## रोजगार वार्ता

### तलाठी

**पदाचे नाव–** तलाठी, पदसंख्या – १९८ जागा **शैक्षणिक पात्रता –** पदाच्या आवश्यकतेनुसार आहे नोकरी **ठिकाण –** जळगाव जिल्हा **वयोमर्यादा –** खुला प्रवर्ग – १८ ते ३८ वर्षे मागास प्रवर्ग – १८ ते ४३ वर्षे **अर्ज शुल्क –** खुला प्रवर्ग – Rs. ५००/– मागासवर्गीय – Rs. ३५०/– **अर्ज पद्धती –** ऑनलाईन **अर्ज करण्याची शेवटची तारीख –** लवकरच अपडेट करण्यात येईल. अधिकृत वेबसाईट – rfd.maharashtra.gov.in

### विधी अधिकारी/ विधी समन्वयक

**पदाचे नाव –** विधी अधिकारी/ विधी समन्वयक, लघुटंकलेखक, सुरक्षा रक्षक **पदसंख्या** –०५जागा **शैक्षणिक पात्रता –** शैक्षणिक पात्रता पदाच्या आवश्यकतेनुसार आहे. **नोकरी ठिकाण** – नागपूर अर्ज पद्धती – ऑफलाईन **अर्ज पाठविण्याचा पत्ता –** अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी भवन दुसरा माळा अमरावती रोड, गिरीपेठ नागपूर – १० **अर्ज करण्याची शेवटची तारीख –** ३० डिसेंबर २०२२ **अधिकृत वेबसाईट –** trti.maharashtra.gov.in अर्ज करण्याचे माध्यम ऑनलाईन

### इंडियन ऑइल कॉर्पो १७६०

**विभागाचे नाव**–IOCL इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड नौकरीचा प्रकार केंद्र सरकार **ऑफिसिअल वेबसाईट**https://iocl.com/ **स्थान** संपूर्ण भारत पदाचे नाव apprentice (Technical-Non-Technical) **पदांची संख्या** १७६० **शैक्षणिक अहर्ता** मेकॅनिकल/ऑटोमोबाईल/इलेक्ट्रिकल/ इलेक्ट्रिकल डिप्लोमा, दहावी, आय. टी. आय. **अर्ज करण्याचा प्रकार** ऑनलाईन **निवड प्रक्रिया –** परीक्षा, मुलाखत.

### I-F भारतीय हवाई दल

**विभागाचे नाव** I-F भारतीय हवाई दल **नौकरीचा प्रकार**– केंद्र सरकार ऑफिसिअल **वेबसाईट** https://indianairforce.nic.in/ **स्थान** संपूर्ण पदाचे नाव, **कमिशन ऑफिसर शैक्षणिक अहर्ता** बारावी, डिग्री, पदवी, MB- / MC- / M- / M.Sc. **अर्ज करण्याचा प्रकार** ऑनलाईन निवड प्रक्रिया मुलाखत

### भारतीय अणुऊर्जा महामंडळ

**विभागाचे नाव** NCPIL **भारतीय अणुऊर्जा महामंडळ** नौकरीचा प्रकार केंद्र सरकार ऑफिसिअल वेबसाईट http://npcilcareers.co.in/**स्थान** संपूर्ण भारत पदाचे नाव Nurse -, Stipendiary Trainees / Scientific Assistant (ST/S-), Pharmacist B, Technician B, Stipendiary Trainees / Technician (ST/TN), Assistant Grade - 1, Steno Grade १ **पदांची संख्या**८९ शैक्षणिक अहर्ता दहावी,बारावी,आय.टी.आय, डिग्री, डिप्लोमा, नर्सिंग **अर्ज करण्याचा प्रकार** ऑनलाईन निवड प्रक्रिया मुलाखत.